# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः08.01.2025** **वारःबुधवार**

1. सीबीआयने विकसित केलेल्या 'भारत पोल' पोर्टलचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन
2. एचएमपीव्ही विषाणू संसर्गामुळे चिंतेचं कारण नाही, केंद्रीय आरोग्य सचिवांचं प्रतिपादन; राज्यातही आरोग्य यंत्रणा सज्ज, आरोग्यममंत्र्यांची ग्वाही
3. येत्या 1 एप्रिलपासून सर्व टोल नाक्यांवर फास्ट-टॅगद्वारेच पथकर भरावा लागणार-राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
4. पारदर्शक आणि गतिमान राज्यकारभारासाठी 'ई-कॅबिनेट' उपक्रम राबवणार आणि
5. नेपाळ-तिबेट सीमावर्ती भागात भूकंपाचे धक्के, 95 मृत्युमुखी

**<u>अमित शहा-भारतपोल पोर्टल</u>**

देशाच्या सुरक्षेसंबंधीच्या आव्हानांवर मात करण्यासाठी भारतपोल पोर्टल उपयुक्त ठरेल असा विश्वास केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी काल व्यक्त केला. केंद्रीय अन्वेषण विभागानं विकसित केलेल्या भारतपोल पोर्टलचा प्रारंभ नवी दिल्लीत भारत मंडपम इथेशहा यांच्या हस्ते करण्यात आला; त्यावेळी ते बोलत होते. भारतपोल पोर्टल आणि तीन नवीन फौजदारी कायदे, परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांना पकडण्यासाठी एक सशक्त यंत्रणा म्हणून काम करतील, असे शहा म्हणाले. हे पोर्टल, तपास यंत्रणा आणि सर्व राज्यांच्या पोलिसांना 195 देशांच्या इंटरपोल नेटवर्कशी जोडून गुन्हे नियंत्रणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल आणि गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणणं सोपं जाईल असं त्यांनी सांगितलं. अमली पदार्थांची, शस्त्रास्त्रांची तसंच मानवी तस्करी आणि सीमेपलीकडील दहशतवाद यासारख्या गुन्ह्यांवर मात करण्यासाठी ही नवीन प्रणाली अतिशय उपयुक्त ठरेल असा विश्वास शहा यांनी व्यक्त केला.

**<u>HMPV लागण</u>**

ह्युमन मेटाप्न्युमोव्हायरस अर्थात एचएमपीव्ही विषाणू संसर्गाच्या भीतीने नागरिकांनी घाबरून जाऊ नये, या विषाणूच्या संसर्गामुळे चिंतेचं कोणतेही कारण नाही, असं केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलिला श्रीवास्तव यांनी म्हटलं आहे. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत काल दूरस्थ माध्यमातून झालेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीदरम्यान, त्यांनी देशातील श्वासोच्छवासाच्या आजारांची सद्यस्थिती, त्यांचं व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य उपायांसह HMPV प्रकरणांच्या स्थितीचा आढावा घेतला.

एचएमपीव्ही विषाणूच्या संसर्गाचा सामना करण्यासाठी राज्य सरकारच्या सर्व यंत्रणा, आरोग्य व्यवस्था सज्ज आहे, अशी ग्वाही राज्य सरकारनं दिली आहे. एचएमपीव्ही विषाणू धोकादायक नाही, त्यामुळे भीती बाळगण्याची आवश्यकता नसल्याचं राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं. एचएमपीव्ही विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर दोन्ही मंत्र्यांनी काल मुंबईत मंत्रालयात पत्रकारांशी संवाद साधला. हा विषाणू, त्याचा प्रतिबंध आणि खबरदारीच्या उपाययोजना याविषयी माहिती देताना राज्याचे साथरोग सर्वेक्षण अधिकारी डॉक्टर प्रदीप आवटे म्हणाले.....

**<u>मंत्रिमंडळ निर्णय</u>**

राज्यातल्या चार चाकी वाहन धारकांना येत्या एक एप्रिल पासून फास्ट टॅग अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं काल घेतला. त्यामुळे राज्यातील सर्व पथकर नाक्यांवर येत्या 1 एप्रिल पासून सर्व वाहनांचा पथकर फास्ट-टॅगद्वारेच

भरावा लागणार आहे. फास्ट-टॅग शिवाय अन्य कोणत्याही माध्यमातून पथकर भरायचा झाल्यास किंवा फास्ट-टॅग सुरु नसेल अथवा फास्ट-टॅगशिवाय वाहनाने फास्ट-टॅगच्या मार्गिकेत प्रवेश केल्यास दुप्पट पथकर भरावा लागणार आहे. प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ आणि गतीमान करणारी सुधारित महाराष्ट्र शासन कार्यनियमावली प्रसिद्ध करण्यासही काल मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या शासन कार्यनियमावलीमुळे शासनाच्या कामकाजातील निर्णय प्रक्रीया अधिक सुलभ आणि गतीमान होण्यास मदत होणार आहे.

**<u>ई-कॅबिनेट उपक्रम</u>**

राज्यातील कारभार अधिक गतीमान आणि पारदर्शी करणे, मंत्रिमंडळातील निर्णय लोकांपर्यंत तातडीने पोहचवणे आणि त्याद्वारे शासकीय कामकाजाला गती देणे आणि सर्वसामान्यांचे प्रश्न जलदगतीने सोडवणे या उद्देशाने राज्यात 'ई-कॅबिनेट' उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी काल मुंबईत, मंत्रिमंडळ बैठकीनंतर याबाबतचे सादरीकरण केलं. 'ई-कॅबिनेट' हा राज्य शासनाचा पर्यावरणपूरक उपक्रम आहे. या हरित उपक्रमांतर्गत कागदविरहीत मंत्रिमंडळ बैठक सहज पार पडू शकेल. तसंच, मंत्रिमंडळ बैठकांचं, त्यातील निर्णयांचं आणि त्यासंबंधीच्या दस्तऐवजांचे जतन होईल. मंत्रिमंडळ निर्णय आणि त्यासंबंधीचे संदर्भ शोधणे सहज शक्य होईल.

**<u>राज्यपाल-मुंबई विद्यापीठ</u>**

शिक्षण ही निरंतर प्रक्रिया असून पदवी प्राप्त केल्यानंतर देखील ते आयुष्यभर सुरु असलं पाहिजे, असं प्रतिपादन राज्यपाल आणि विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी काल केलं. मुंबई विद्यापीठाच्या वार्षिक दीक्षान्त समारंभात ते काल मुंबईत बोलत होते. सर्व विद्यापीठांनी वर्षाच्या सुरुवातीलाच वर्षभराचं शैक्षणिक वेळापत्रक तयार करावं, ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावं आणि त्याची काटेकोरपणं अंमलबजावणी करावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या दीक्षान्त समारंभामध्ये 1 लाखांहून अधिक स्नातकांना पदव्या, 401 स्नातकांना पी. एचडी., तर 18 विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकं प्रदान करण्यात आली. या समारंभाला उच्च, तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य, रोजगार आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

**<u>डूडी-पत्रकार परिषद</u>**

पुण्याच्या जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर जितेंद्र डूडी यांनी काल प्रसारमाध्यमांशी संवाद साधत, विविध विकास कामांची माहिती दिली. पायाभूत सेवांमध्ये समावेश असणाऱ्या रिंग रोड प्रकल्पाचं काम लवकरच सुरू करणार असल्याचं, त्यांनी सांगितलं. या प्रकल्पाच्या पश्चिम भागात 90 टक्के तर पूर्व भागात 82 टक्के भू संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, असं ते म्हणाले. पुणे जिल्ह्याला एकात्मिक पर्यटन केंद बनवण्यासाठी पर्यटन प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र मजबूत करण्यासाठी स्मार्ट पीएचसी उपक्रम हाती घेण्यात येणार असून, ग्रामीण भागातील नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयात चकरा मारायला लागू नये यासाठी ई-कार्यालय शंभर टक्के क्षमतेने सुरू करणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

**<u>मुख्यमंत्री-नवेगावबांध</u>**

एमटीडीसी अर्थात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांध आणि चांदपूर पर्यटक निवासाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल दूरस्थ माध्यमातून लोकार्पण करण्यात आलं. इथला पर्यटक निवास पर्यटकांसाठी पर्वणी ठरेल, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केलं. नवेगावबांध इथे राष्ट्रीय पक्षी उद्यान असून, सैबेरियासारख्या अतिदूर प्रदेशातून येणारे पक्षी विशिष्ट हंगामात दरवर्षी इथे येतात.

**<u>पुरंदर-विमानतळ</u>**

महाराष्ट्रातील सर्व विमानतळाच्या विमानसेवा आणि विकासकामांसदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय नागरीक हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यात नुकतीच बैठक झाली. या बैठकीतील निर्णयानुसार, पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला आता गती मिळणार आहे. येत्या सप्टेंबरपर्यंत

डीपीआर अंतिम करण्यात येणार असून भूसंपादनाची प्रक्रिया सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला दिले आहेत. मार्च 2029 पर्यंत हे आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं असल्याचं मोहोळ यांनी सांगितलं.

**निधन-अहिरे-नाशिक**

नाशिक जिल्हा महिला सहकारी बॅंकेच्या माजी अध्यक्ष तसंच सहकार भारतीच्या माजी प्रदेशाध्यक्षा डॉक्टर शशीताई आहिरे यांचं काल सकाळी नाशिकमध्ये निधन झालं. त्या 76 वर्षांच्या होत्या. अनेक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी समाजोपयोगी कामं केली.

**नेपाळ-भूकंप**

नेपाळ-तिबेट सीमावर्ती भागाला काल सकाळी भूकंपाचे तीव्र धक्के बसले. 7 पूर्णांक 1 रिख्टर क्षमतेच्या या भूकंपात सुमारे 95 हून अधिक लोक मृत्युमुखी पडले असून 130 पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. भूकंपाचं केंद्र नेपाळ सीमेजवळ तिबेट स्वायत्त प्रदेशातील झिझांग इथे होतं. देशात दिल्ली, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि उत्तर भारतातही भूकंपाचे धक्के जाणवले. मात्र देशात आतापर्यंत कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचं नुकसान झालं नसल्याचं वृत्त आहे.

**हवामान**

उद्या सकाळपर्यंत राज्यात हवा कोरडी आणि सुरप्रकाशीत राहेल असा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.